दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.२४ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २६१ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 24 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 261 | Pages 4 | Rate 4 Rs

## पुढच्या ४८ तासांत मुंबई पुण्यात पाऊस

**मुंबई–** राज्यात पुढील ७२ तास विदर्भात उष्णतेची तीव्र लाट कायम राहणार असून हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला आहे. ब्रह्मपुरी येथे शनिवारी तब्बल ४७.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मात्र मान्सून महाराष्ट्राच्या किनारपट्टीजवळ पोहोचल्याने २७ मे नंतर उष्णतेची तीव्रता कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.मुंबई, पुण्यासह राज्यातील अनेक भागांत पुढील ४८ तासांत मुसळधार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. रविवारी काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. मान्सून वेगाने पुढे सरकत असून अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात त्याची प्रगती चांगली होत आहे. त्यामुळे मे महिन्याच्या अखेरीस राज्यातील अनेक भागांत मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात होऊ शकते.दरम्यान, विदर्भातील अनेक शहरांमध्ये तापमान ४५ अंशांच्या पुढे गेले आहे. ब्रह्मपुरीनंतर अकोला, अमरावती, चंद्रपूर, नागपूर, वर्धा आणि यवतमाळमध्येही प्रचंड उकाडा जाणवत आहे.

# इंधनाची साठेबाजी करू देऊ नका

# मुख्यमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

## 'अल निनो'च्या पार्श्वभूमीवर प्लॅन तयार असल्याची ग्वाही

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना इंधनाच्या साठेबाजीवर बारीक लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले. सध्या काही ठिकाणी इंधनाअभावी तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. पण ती सर्वदूर नाही. सरकारने या प्रकरणी सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना पेट्रोल - डिझेल विशेषतः डिझेलच्या वाटपावर जातीने लक्ष घालण्याचे निर्देश दिलेत. सर्वांना गरजेनुसार डिझेल मिळावे असा सरकारचा प्रयत्न आहे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी 'अल निनो'च्या पार्श्वभूमीवर सरकारचा प्लॅन तयार असल्याचेही स्पष्ट केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित इमॅजिन नेक्स्ट-२०२६ या कार्यक्रमाला हजेरी लावली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आपण एआय तंत्रज्ञानाला टाळू शकत नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, इमॅजिन नेक्स्ट हा एक अत्यंत महत्त्वाचा इव्हेंट येथे होत आहे. एआय व टेक्नॉलॉजीशी संबंधित लोकांना येथे निमंत्रित करण्यात आले होते. मी या कार्यक्रमाला एआयच्या ॲडोप्शन संदर्भात महाराष्ट्र काय करत आहे, याची माहिती दिली. कारण, आपल्याला माहिती आहे की, एआयची लाट आता कुणीही थांबवू शकत नाही. पण आपण त्या लाटेवर स्वार होऊन आपल्या सामाजिक व आर्थिक लढाईला गती देऊ शकतो. तोच प्रयत्न इंडिया एआय मिशनच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. तोच प्रयत्न महाराष्ट्रात आपण करत आहोत. या प्रकरणी आपली रणनीती काय आहे हे आम्ही सांगण्याचा प्रयत्न केला.महाराष्ट्राची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे. सध्याचा आपला विकास दर पुढील २-३ वर्षे कायम ठेवला, तर आपण सिंगापूर व यूएईला मागे टाकू शकतो अशी स्थिती आहे. पंतप्रधानांचे जे मिशन आहे तेच आमचे मिशन आहे. तेच मिशन आम्ही महाराष्ट्रातही राबवत आहोत. कारण, सध्या देश जगाच्या अशा वळणावर उभा आहे की, आत्ता नाही तर कधीच नाही. आम्ही अशा विकासाच्या मार्गावर चालत आहोत. त्यामुळे २०४५ विकसित महाराष्ट्र व विकसित भारत बनेल.

# कपडे वाळायला घालण्याच्या दोऱ्या सोडल्या, रेल्वे कर्मचाऱ्यावर विळ्याने हल्ला

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कोरेगाव येथे कपडे वाळायला घालण्यासाठी बांधलेल्या दोऱ्या सोडल्याच्या कारणा वरून गोवा येथे रेल्वे विभागात ऑपरेटर म्हणुन कार्यरतअसलेल्या रेल्वे कर्मचाऱ्याच्या डोक्यात विळा मारून व चापट-बुक्क्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे.केज तालुक्यातील कोरेगाव येथील श्रीराम भारत मुंडे वय २९ वर्ष हे गोव्यातील वेरणा रेल्वे स्टेशन येथे इलेक्ट्रीक इंजीनियर डिपार्टमेंटमध्ये प्रोफाईलऑपरेटर म्हणून नोकरीस आहे.सुट्टी निमित्त ते कोरेगाव येथे गावाकडे आले होते.दि. १० मे रोजी दुपारी २ वाजण्याच्या दरम्यान सुट्टी संपल्याने ते परत कर्तव्यावर निघाले असता,त्यांचे घराशेजारी दत्तात्रय किसन मुंडे यांनी घराचे समोर रस्त्यावर कपडे वाळायला घालण्यासाठी दोऱ्या



बांधल्या होत्या.त्या रस्त्याने ये-जा करणाऱ्यांच्या डोक्याला लागत असल्याने,गाडी वरुन पडु नये म्हणुन श्रीराम मुंडे यांनी त्या सोडल्या होत्या.यावरून दत्तात्रय किसन मुंडे व सुरज दत्तात्रय मुंडे या दोघांनी रेल्वे कर्मचारी श्रीराम मुंडे यांच्या अंगावर धावून येत शिवीगाळ करीत त्यांच्यावर विळ्याने हल्ला करून डोक्यात विळा मारून जखमी केले.व चापटा बुक्क्या ने ही मारहाण करीत मुक्कामार देऊन जिवे मारण्याची धमकी दिली.श्रीराम मुंडे यांच्या फिर्यादीवरून दत्तात्रय मुंडे,सूरज मुंडे या दोघा बाप-लेका विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन पोलीस निरीक्षक स्वप्नील सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला जमादार संगीता हनवते या पुढील तपास करीत आहेत.

# 'पत्नी मोलकरीण नाही' या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे डॉ.नीलम गोऱ्हे यांच्याकडून स्वागत

## महिलांच्या सन्मान, समानता आणि स्वातंत्र्याला न्याय देणारा निर्णय

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

पत्नीने स्वयंपाक, साफसफाई किंवा घरातील इतर कामे करण्यास नकार दिला म्हणून ती वैवाहिक कायद्यानुसार क्रूर ठरत नाही, तसेच पत्नी ही घरकामासाठी ठेवलेली मोलकरीण नसून तिच्या सन्मानाचा आदर राखला गेला पाहिजे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे आमदार व स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्वागत केले आहे.

न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी दिलेल्या या निर्णयाबद्दल डॉ. गोऱ्हे यांनी त्यांना अभिनंदनपर पत्र पाठविले आहे. महिलांच्या सन्मान, समानता आणि स्वातंत्र्याला न्याय देणारा हा निर्णय अनेक महिलांना दिलासा देणारा ठरेल, असे त्यांनी म्हटले आहे.

आजच्या काळातील कामकाजी महिलांच्या वास्तवाचा विचार करून न्यायालयाने घेतलेली भूमिका संवेदनशील आणि दिशादर्शक असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी पत्रात नमूद केले. पत्नी ही केवळ घरकामासाठी नसून तिच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि स्वातंत्र्याचाही आदर झाला पाहिजे, हा महत्त्वाचा संदेश या निर्णयातून समाजाला मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

शिवसेना नेत्या, विधानपरिषद सदस्या व स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा, या नात्याने न्यायालयाच्या या निर्णयाबद्दल दोन्ही न्यायमूर्तींचे आपण मनःपूर्वक अभिनंदन करत असल्याचेही डॉ. गोऱ्हे यांनी पत्रात म्हटले आहे.




# दोन विवाहित महिलांचा सासरी छळ

## सासरच्या आठ जणाविरुद्ध गुन्हा नोंद

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

कार घेण्यासाठी माहेर हून २० लाख रुपये घेऊन येत नसल्याचे कारणा वरून एका ३० वर्षीय विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून तीला घराबाहेर हाकलून दिल्याची घटना तेरखेडा ता.वाशी येथे घडली.तर दुसऱ्या घटनेत एका २७ वर्षीय विवाहितेचा कर्ज फेडण्यासाठी माहेरहून पैसे आणत नसल्या वरून शारीरिक व मानसिक छळ केल्याची घटना आढाळा ता.कळंब येथे घडली.या दोन्ही घटनेप्रकरणी पतीसह सासरच्या लोकांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

केज शहरातील फुलेनगर माहेर असलेल्या प्रतिमा प्रवीण उर्फ बबलू सरवदे वय ३० वर्षे या विवाहिते चा २०१६ मध्ये तेरखेडा ता.कळंब येथील प्रवीण बाबासाहेब सरवदे सोबत विवाह झाला होता.लग्ना नंतर दोन मुली झाल्या. त्यानंतर तुझ्या आई वडिलांनी लग्नात हुंडा दिला नाही,म्हणून कार घेण्यासाठी २० लाख रुपये माहेरहून आणण्या साठी पतीसह सासरच्या लोकांनी तगादा लावला. प्रतिमा सरवदे हिने आई वडिलांची परिस्थिती गरिबीची असल्यामुळे तेवढी रक्कम आणण्यास नकार दिल्याने तु येथे राहु नकोस.तु जर येथे राहिली तर तुझा काटाच काढुत अशा जिवे मारण्याच्या धमक्या देऊन घराबाहेर हाकलून दिले.अशी फिर्याद प्रतिमा सरवदे यांनी दिल्यावरून पती प्रवीण सरवदे,चुलत सासरे सुहास सरवदे,चुलत सासू सिमा सरवदे,चुलत दिर संस्कार सरवदे, चुलत नणंद सायली सरवदे अशा सासरच्या ५ जणांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात



गुन्हा नोंद झाला आहे.दुसऱ्या घटनेत केज तालुक्यातील वाघे बाभूळगाव माहेर असलेल्या प्रतिभा शशिकांत खंडागळे वय २७ वर्षे हिचा २०२४ मध्ये आढाळा ता.कळंब येथील शशीकांत बापुराव खंडागळे याच्यासोबत विवाह झाला होता.लग्ना नंतर त्यांना एक मुलगी झाली.कर्ज फेडण्यासाठी आई वडिलांकडुन पैसे आणण्यासाठी तगादा लावून चारित्र्यावर संशय घेत पती,सासू,सासऱ्याने शारीरिक व मानसिक छळ करीत दुसरे लग्न करायचे आहे,आमची मुलगी आम्हाला दे म्हणत नसता तुझ्या माहेरी येऊन आत्महत्या करण्याची धमकी पती शशिकांत खंडागळे याने दिली अशी तक्रार प्रतिभा खंडागळे यांनी केज पोलिसात दिल्यावरून पती शशिकांत खंडागळे, सासू कौशल्या खंडागळे, सासरे बापुराव खंडागळे या तिघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.दोन्ही ही प्रकरणी पोलीसनिरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास चालु आहे.

# केज मध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाची हजेरी

## वीज पुरवठा खंडित, नागरिकांची उडाली धावपळ

### तापमाना पासून दिलासा मिळाला असला तरी जनजीवन विस्कळीत; गारांच्या वर्षावामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहर व परिसरात आज शनिवारी संध्याकाळच्या सुमारास अचानक हवामानात बदल होऊन जोरदार वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. पावसासोबतच काही ठिकाणी गारांचा वर्षाव झाल्याने नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली.दरम्यान,वादळी वाऱ्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून शहरासह ग्रामीण भागातील वीज पुरवठा तात्काळ खंडित करण्यात आला होता.या पावसामुळे कडक उन्हाळा आणि उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना थंडावा मिळाल्याने तात्पुरता दिलासा मिळाला असला,तरी अचानक आलेल्या या संकटामुळे मात्र चांगलीच तारांबळ उडाली.अचानक बदलले वातावरण,गारांचा वर्षाव

गेल्या काही दिवसां पासून केज परिसरात प्रचंड उकाडा जाणवत होता.नागरिक उष्णतेने त्रस्त झाले होते.अशातच आज शनिवार,२३ मे रोजी संध्याकाळच्या सुमारास अचानक आकाशात काळेकुट्ट ढग जमा झाले आणि पाहता पाहता वेगवान वादळी वारे वाहू लागले.वादळी वाऱ्याच्या पाठोपाठ रिमझिम पावसाला सुरुवात झाली आणि काही वेळातच गारा पडू लागल्या.संध्याकाळच्या वेळी अचानक आलेल्या या वादळ-पावसामुळे



रस्त्यावरील पादचारी, वाहनधारक आणि व्यावसायिकांची सुरक्षित जागा शोधण्यासाठी एकच धावपळ उडाली.

**वीज पुरवठा खंडित, शहर अंधारात**

वादळी वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने कुठेही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी वीज वितरण कंपनीच्या वतीने शहरा तील वीज पुरवठा तातडीने खंडित करण्यात आला.आधीच संध्याकाळची वेळ आणि त्यातच वीज गुल झाल्यामुळे संपूर्ण केज शहर काही काळ अंधारात बुडाले होते. रात्री उशिरापर्यंत वीज पुरवठा सुरळीतकरण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे समजते.

**उकाड्यापासून सुटका, पण शेतकरी चिंतेत**

वातावरणात झाला थंडावा या अवकाळी आणि गारांच्या पावसा मुळे हवेत अचानक गारवा निर्माण झाला आहे.गेले कित्येक दिवस असह्य गरमीने हैराण झालेल्या केजकरांना या थंडाव्यामुळे मोठा दिलासा मिळाला असून वातावरणातील उष्णता कमी झाली आहे.परंतु, दुसरीकडे या वादळी वाऱ्याचा आणि गारांचा फटका परिसरातील आंबा पिकांना तसेच भाजीपाला व इतर पिकांना बसण्याची शक्यता असल्याने बळीराजा मात्र काहीसा चिंतेत पडला आहे. अचानक आलेल्या या पावसाने शहरात काही ठिकाणी किरकोळ पडझड झाल्याचीही प्राथमिक माहिती आहे.

# संपादकीय

## पेपरफुटीचा अमानुष खेळ

३ मे रोजी झालेली यूजी 'नीट' ही राष्ट्रीय वैद्यकीय सामायिक परीक्षा नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)ने रद्द झाल्याचे ठरवून परत नव्याने परीक्षा घेणार असल्याचे जाहीर केल्यामुळे देशभरातील लाखो विद्यार्थी अनिश्चितता आणि निराशेच्या गर्तेत सापडले आहेत. अनेक राज्यांत ६०० मार्कांचे १४० प्रश्न हे परीक्षेच्या तीन आठवडे आधीच १० लाख रुपये प्रतिपेपर दराने विकले गेल्याचे उघडकीस आल्यावर हा निर्णय घेण्यात आला. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे 'नीट' परीक्षा घोटाळा हा तिसऱ्यांदा उघडकीला आलेला आहे. वैद्यकीय प्रवेशासारख्या सर्वसामान्यांच्या जगण्या-मरण्याशी संबंधित असलेल्या परीक्षेबाबतची पारदर्शकता टिकवता न येणे हे केवळ अपयश नव्हे तर लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्य व भावनांशी खेळण्याचा तो अक्षम्य गुन्हा आहे.एमबीबीएस प्रवेशाच्या जागा आहेत १ लाख २९ हजार ६०३. त्यासाठी दरवर्षी परीक्षेला बसतात साधारण २२ ते २५ लाख विद्यार्थी. केवळ एमबीबीएस नव्हे तर बीडीएस, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिद्धा, नर्सिंग, फिजिओथेरपी अशा सर्व वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी 'नीट' ही एकच सामायिक प्रवेश परीक्षा देशभर घेतली जाते. या पैकी अनेक विद्यार्थी या परीक्षेची तयारी पाच-पाच वर्षेही करत असतात. 'नीट' सोबतच पदव्युत्तर प्रवेश परीक्षा व परदेशातील वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'एफएमसीईजी' या परीक्षांवरही वेळोवेळी प्रश्नचिन्हं उपस्थित झाली आहेत. तीन वर्षे उघडीस आलेल्या या घोटाळ्यांमुळे आता होणार असलेल्या फेरपरीक्षेवरही विश्वास कसा ठेवायचा असा प्रश्न विद्यार्थी आणि पालकांना पडला आहे.या परीक्षेची पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी सध्याच्या व्यवस्थेत सुधारणा करणे हा केवळ तात्पुरता बदल ठरेल. ही परीक्षा पूर्णतः संगणकाधारित करणे हाच दूरगामी आणि कायमचा उपाय आहे. 'नीट' परीक्षेत छापील प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका या ओएमआर (ऑप्टिकल मार्क रिकग्निशन) शीटच्या स्वरूपात असून त्यावर पेनाने खुणा करून उत्तरे द्यावी लागतात. या पद्धतीतच घोटाळ्याची अनेक बीजे आहेत. यावर्षी प्रश्नपत्रिका छपाईचे काम जयपूर येथील एका खासगी एजन्सीला देण्यात आले होते. तिथूनच ती फुटल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. भारत सरकारचा मुद्रण व लेखन सामग्री संचलनालय हा छपाईची अवाढव्य यंत्रणा असलेला विभाग अस्तित्वात आहे. मग 'नीट' सारख्या अत्यंत संवेदनशील परीक्षेच्या प्रश्न पत्रिकेच्या छपाईचे काम बाहेर का दिले जाते, असा प्रश्न पडतो. मूळ प्रश्न पत्रिकेचे सेट हे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत ठेवले जातात आणि पेपर फुटला तर पर्यायी प्रश्न पत्रिकेचे सेट हे कॅनरा बँकेच्या शाखेत ठेवले जातात. खरे तर ही माहिती अत्यंत गोपनीय असायला हवी, पण वर्षानुवर्षे या गोष्टी जगजाहीर आहेत.'नीट' परीक्षा घेण्याचा खर्च हा २०० कोटी रुपये आहे व 'एनटीए'कडे अर्ज भरताना विद्यार्थ्यांकडून जमा होणारे एकूण शुल्क ३०० कोटी रुपये असते. 'नीट' परीक्षा सुरू झाल्यापासून आजवर 'एनटीए'कडे ३,५१३ कोटी रुपये शुल्क म्हणून जमा झाले आहेत व ३,०६५ कोटी रुपये खर्च झाले आहेत. नफा म्हणून कामावलेले ४४८ कोटी रुपये हे आता 'नीट'ची प्रक्रिया सुधारण्यासाठी वापरणे अपेक्षित आहे. खरे तर ही परीक्षा म्हणजे पैसे कमावण्याचे साधन नाही. शासनाने पदरचे पैसे खर्च करून ती अधिक पारदर्शक करावी इतकी ही महत्त्वाची परीक्षा आहे. आता फेरपरीक्षेसाठी पुन्हा २०० कोटी रुपये खर्च येणारच आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला जिल्हा केंद्रावर जाऊन परीक्षा देण्यासाठी पुन्हा खर्च करावा लागेल, त्याचा एकत्रित विचार केला तर तो आकडा ३०० कोटी रुपये होतो. सर्वसामान्यांच्या पैशाचा हा एक प्रकारे अपव्ययच आहे.या परीक्षेत पारदर्शकता आणण्याची पहिली पायरी म्हणजे या परीक्षा पूर्णपणे जेईई व कॅटप्रमाणे संगणकीय पद्धतीने व्हायला हव्यात. परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांची ओळख ही फेस रेकग्निशन म्हणजे चेहरा व आधार कार्डमध्ये दिलेला आयरिस म्हणजे डोळ्यांचा पडदा स्कॅन करून पटवून घेणे सहज शक्य आहे. परीक्षेतून दरवर्षी १०० कोटी कमावणाऱ्या एनटीएला खर्चाचे कारण सांगून आणि ही यंत्रणा उभी करणे अवघड असल्याची सबब पुढे करून पळ काढता येणार नाही. खरे तर ही परीक्षा सगळीकडे एकाच दिवशी घेण्याचीही गरज नाही. इतर परीक्षांप्रमाणे ती टप्प्याटप्प्याने घेतली जाऊ शकते. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून हॅकिंगसारखे गैरप्रकार टाळणे सहज शक्य आहे. आयटी कंपन्यांना या परीक्षेचे काम दिले जाते. काही गैरप्रकार घडल्यास त्यांना जबाबदार धरून दंडाची तरतूद करणेही आवश्यक आहे.पेपर फुटणे हा गैरप्रकाराचा केवळ एकच मार्ग झाला. तो उघड झाला म्हणून कळला. अजून असे अनेक मार्ग निश्चितच असतील, जे अद्याप कुणालाच माहीत झालेले नाहीत. २०२४ साली राजस्थानमध्ये चुकीचा पेपर वाटला गेला. दुसरा पेपर देण्यास उशीर लागला म्हणून विद्यार्थ्यांना चक्क ग्रेस मार्क्स देऊन टाकण्यात आले होते. इतक्या तीव्र स्पर्धेच्या व महत्त्वाच्या परीक्षेत असा प्रशासकीय गोंधळ होणे हा सर्वसामान्यांच्या जीवाशी आणि जीवनाशीही खेळ आहे. या परीक्षेतून डॉक्टर म्हणून थेट लोकांच्या जीवाचा ताबा आपण या विद्यार्थ्यांना देत असतो. यातले गांभीर्य केंद्र सरकारने लक्षात घेणे गरजेचे आहे.कुठलीही वेळेची मर्यादा न पाळता चालणारी दीर्घ प्रवेश प्रक्रिया हा या परीक्षेचा आणखी एक मोठा दोष आहे. विद्यार्थी व पालकांच्या मानसिक छळाचे तेही एक कारण आहे. 'नीट'ची परीक्षा होते मे महिन्याच्या पहिल्या रविवारी, मात्र प्रवेश प्रक्रिया संपण्यासाठी फेब्रुवारी महिना उजाडतो. ही प्रक्रिया पूर्णपणे संगणकीकृत असूनही ती पूर्ण होण्यास १० महिने का लागावे? फार तर एका महिन्यात ती संपायला हवी. चांगल्या बुद्धिमत्तेची १८ ते २० वयोगटातील लाखो मुलांची एक पूर्ण पिढी १० महिने घरी रिकामी बसवून आपण किती मानवी क्रयशक्ती वाया घालवतो? याचे कारण असे की नव्या वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी देण्यासाठी कुठलीही तारखेची मर्यादा केंद्र व राज्य सरकार पाळत नाही. प्रवेश परीक्षा असो की प्रवेश प्रक्रिया यातील गोंधळाच्या मुळांचा शोध घेतला तर अशा अनेक गोष्टी लक्षात येतील.केंद्र शासन वैद्यकीय प्रवेशाच्या जागा वाढवण्यास उत्सुक आहे. त्यात काही गैर नाही, पण या जागा वाढवताना त्या भरण्यासाठीचा पाया असलेली प्रवेश परीक्षा ही भक्कम व पारदर्शक करणे ही पहिली गरज आहे. अन्यथा केवळ संख्यात्मक वाढ करून अनागोंदी वाढीस लागेल. पेपरफुटी सारखी प्रकरणे ही सर्व सामान्यांच्या स्वप्नांशी केलेला अमानुष खेळ आहे ही जाणीव ठेवून 'नीट'चे पारदर्शक नियोजन आवश्यक आहे.'नीट' परीक्षेतील पेपर फुटी आणि अन्य गैर प्रकारांचा संबंध हा खाजगी कोचिंग क्लासेसशी आहे. 'लातूर', 'कोटा' यांच्या धर्तीवर अनेक ठिकाणी मोठी कोचिंग इंडस्ट्री उभी राहिली आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमात हमखास प्रवेशाची खात्री देत या क्लासेसमध्ये लाखो रुपयांचे शुल्क भरून प्रवेश घेतला जातो. या इंडस्ट्रीत आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी व क्लासमधील अधिकाधिक मुलांना वैद्यकीय प्रवेश मिळावा यासाठी कोचिंग क्लासेसमध्ये प्रचंड स्पर्धा असते. त्यातून अशा गैरप्रकारांचा आधार घेतला जातो. या क्लासेसचे नीट परीक्षा यंत्रणेशी असलेले संबंध आता या तिसऱ्या पेपरफुटीच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत. ही भ्रष्ट 'छिद्रे' बुजवायची असतील तर परीक्षेशी सबंधित प्रक्रियेतील पारदर्शकतेची पातळी राखणे हेच उत्तर आहे. पेपरफुटीच्या आधीच्या प्रकरणांतील आरोपींवर काय कारवाई झाली, याचे उत्तरही सरकारला संतापलेल्या विद्यार्थी आणि पालकांना द्यावे लागणार आहे.

# १५ ऑगस्टपर्यंत रिक्षा-टॅक्सी चालकांना व्यावहारिक मराठी शिकणे सक्तीचे-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई | प्रतिनिधी**

राज्यातील प्रवाशांसोबत रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठीत संवाद साधता यावा, यासाठी त्यांना मराठी भाषा शिकविण्याची राज्य शासनाची भूमिका असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी १५ ऑगस्टपर्यंत व्यावहारिक मराठी भाषा ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष प्रशिक्षण केंद्रांमध्ये शिकणे सक्तीचे असून, १६ ऑगस्टनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा प्रशिक्षणासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री श्री. सरनाईक बोलत होते. या बैठकीस राजेश नार्वेकर, रवी गायकवाड, संदेश चव्हाण, डॉ. ना.कों. भोसले, डॉ. श्यामकांत देवरे, प्रा. सुहासिनी किर्तीकर, डॉ. ज्योती ठाकरे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, प्रा. डॉ. प्रदीप ढवण, अरुण म्हात्रे, मीनाक्षी जयकर, स्वाती गावडे, शिवाजी गावडे, दीपा ठाणेकर, मोहन पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी परिवहन विभागाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या माध्यमातून राज्यभरात मराठी भाषा अभ्यास केंद्रे उभारण्यात येणार आहेत. तसेच रिक्षा संघटना आणि शिवसेना शाखांमधील उपलब्ध जागांमध्येही ही केंद्रे १५ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहेत.

रिक्षा-टॅक्सी चालकांनी ऑनलाईन किंवा आपल्या परिसरातील प्रत्यक्ष केंद्रांमध्ये जाऊन मराठी भाषा शिकून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. या प्रशिक्षणासाठी सुमारे चार हजार शिक्षक सहभागी होणार असून, प्रत्येक महिन्यातील चार शनिवार आणि रविवार चालकांच्या सोयीप्रमाणे किमान चार तासांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. काही शिक्षक मानधनाशिवाय प्रशिक्षण देणार असून, काहींना प्रति तास एक हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे.

**मानधनासाठी मराठी भाषा विभागाकडून दोन कोटी रुपयांची तरतूद**

मराठी भाषा प्रशिक्षणासाठी आवश्यक मानधनाच्या खर्चासाठी मंत्री श्री. सरनाईक यांच्या विनंतीनुसार मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी दोन कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना त्यांनी दूरध्वनीद्वारे संबंधित



अधिकाऱ्यांना दिल्या. उर्वरित खर्च परिवहन विभागामार्फत करण्यात येणार आहे.

**प्रशिक्षणानंतर चालकांना प्रमाणपत्र**

रिक्षा-टॅक्सी चालकांनी या उपक्रमात सहभागी होऊन यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केल्यास त्यांना परिवहन विभागामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यासाठी चालकांची मराठी भाषेवरील व्यवहारिक क्षमता तपासण्यासाठी प्रशिक्षण केंद्रांमध्ये तोंडी परीक्षा घेतली जाणार असल्याची माहितीही मंत्री श्री. सरनाईक यांनी दिली.परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांनी प्रशिक्षण केंद्रांची अंतिम यादी निश्चित करून ऑनलाईन आणि ऑफलाईन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

रिक्षा-टॅक्सी चालकांची मंगळवारी बैठक आयोजित करण्यात आली असून, त्यांनी विनामूल्य उपलब्ध असलेले ऑनलाईन अथवा ऑफलाईन प्रशिक्षण घेऊन व्यावहारिक मराठी आत्मसात करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. चालकांच्या वेळेनुसार प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाणार असली, तरी १५ ऑगस्टपर्यंत मराठी भाषा शिकली नाही तर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा पुनरुच्चार मंत्री श्री. सरनाईक यांनी केला.

**प्रशिक्षणासाठी करण्यात आलेली तयारी**

सचित्र आणि सोप्या भाषेतील पाठ्यक्रम पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

प्रत्येक केंद्रांतर्गत उपकेंद्रे उभारली जाणार आहेत.

रिक्षा-टॅक्सी तसेच ओला, उबेर, रॅपिडो वाहनांवर मराठी संदर्भातील जनजागृती स्टिकर्स लावले जाणार आहेत.मराठी भाषा प्रचार-प्रसारासाठी विशेष बॅनर्स तयार करण्यात येत आहेत.

# मकरंद अनासपुरे,जितेंद्र जोशी यांचा रहस्य आणि कॉमेडीचा भन्नाट तडका असलेल्या 'तुंबाडची मंजुळा'चा ट्रेलर प्रदर्शित

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**






सध्या सर्वत्र चर्चेचा विषय असलेला ,आपल्या पोस्टर, टिझर आणि गाण्यांमधून प्रचंड उत्सुकता निर्माण केलेल्या झी स्टुडिओजची निर्मिती असलेल्या तुंबाडची मंजुळा या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीस आला असून त्यातून या चित्रपटाबद्दलची उत्कंठा अजूनच जास्त वाढली आहे. रहस्य, भीती , गुढता आणि त्याच्या सोबतीला एकाहून एक अतरंगी गावकऱ्यांची धमाल गोष्ट या ट्रेलरमधून बघायला मिळत असल्याने एक परिपूर्ण मनोरंजक चित्रपटाची मेजवानी मिळणार असल्याची चर्चा प्रेक्षक सोशल मीडियावर करत आहेत. मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या एका दिमाखदार सोहळ्यात या चित्रपटाचा ट्रेलर अनेक मान्यवरांच्या आणि कलाकारांच्या उपस्थितीत प्रदर्शित करण्यात आला.चित्रपटात आजीच्या भूमिकेत दिसणाऱ्या उषा नाडकर्णी यांच्या निवेदनातून आपण या गावात आणि त्या विश्वात प्रवेश करतो. या ट्रेलरमध्ये गावाची आणि तिथल्या व्यक्तिरेखांची ओळख करून देताना त्यांच्या खास शैलीतील निवेदनामुळे ट्रेलरला एक वेगळीच रंगत आली आहे. यामध्ये एक गाव, त्यातील गावकरी, त्यांच्यावर घोंगावणारं एक अदृश्य संकट आणि त्यातून घडणाऱ्या असामान्य घटनांची झलक पाहायला मिळते. जरी चित्रपटाला भयपटाची पार्श्वभूमी असली, तरी हा चित्रपट निखळ विनोद आणि भरभरून मनोरंजनाचा अनुभव देणारा असल्याचं ट्रेलरमधून स्पष्ट होतं. मकरंद अनासपुरे, जितेंद्र जोशी , ओम भुतकर, अंशुमन विचारे, योगेश शिरसाट, गणेश पंडीत, शार्दूल सराफ यांच्यासोबत इतर कलाकारांचा सहजसुंदर अभिनय, विनोदाचं अचूक टायमिंग, सोबतीला असलेले भन्नाट संवाद यातून या गोष्टीची आणि या गावाची अतरंगी झलक आपल्या बघायला मिळते. पण सोबतीनेच ट्रेलरच्या उत्तरार्धात एका गुढ वलयात दिसणारी सई ताम्हणकर सर्वांचं लक्ष वेधून घेते. तिचं नेमकं पात्र काय आहे ?तिच्या गुढतेमागची गोष्ट काय आहे ? असा विचार हा ट्रेलर बघणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकाच्या मनात येतो आणि या कथेबद्दलची उत्कंठा वाढवतो. रहस्य उलगडण्याच्या प्रवासात प्रेक्षकांना खळखळून हसवतानाच पुढे काय घडणार याची उत्सुकता कायम ठेवण्यात ट्रेलर यशस्वी ठरताना दिसत आहे. दिग्दर्शक विविध कोरेगांवकर म्हणतात, ''करीअरच्या सुरुवातीलाच एवढ्या मोठ्या चित्रपटाचं दिग्दर्शन करायची संधी मिळणं ही माझ्यासाठी अत्यंत मोठी गोष्ट आहे. झी स्टुडिओज मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर यांनी माझ्यावर विश्वास टाकत ही संधी मला दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. हा चित्रपट प्रेक्षकांना एका वेगळ्या आणि अनोख्या विश्वात घेऊन जाणारा अनुभव आहे. हा चित्रपट तयार करताना आम्ही प्रत्येक पात्र, त्याची शैली आणि प्रत्येक प्रसंग वेगळ्या पद्धतीने उभा करण्याचा प्रयत्न केला आहे. ट्रेलरमधून आम्ही एक छोटीशी झलक दाखवली आहे. 'तुंबाडची मंजुळा' प्रेक्षकांना नक्की आवडेल, याची आम्हाला खात्री आहे.'' झी स्टुडियोजचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणतात, ''तुंबाडची मंजुळा हा खऱ्या अर्थाने पूर्णपणे झी स्टुडिओजची निर्मिती असलेला चित्रपट आहे त्यामुळे आमच्यासाठी त्याचं विशेष महत्त्व आहे. आपल्या प्रेक्षकांना एक परीपूर्ण मनोरंजन देण्याचा आमचा प्रयत्न आहे. एकाहून एक दिग्गज कलाकार , गुढता आणि रहस्याभोवती फिरणाऱ्या गोष्टीला दिलेला विनोदाचा तडका , श्रवणीय संगीत असे मनोरंजनाचे विविध पैलू यात प्रेक्षकांना बघायला मिळतील. सध्या प्रेक्षकांना मनोरंजनासोबत काहीतरी वेगळं आणि ताजं पाहायचं आहे आणि हा चित्रपट त्याच अपेक्षांवर नक्कीच खरा उतरेल, असा विश्वास आम्हाला आहे. रहस्य, विनोद आणि कलाकारांची भन्नाट केमिस्ट्री यामुळे हा चित्रपट सर्व वयोगटातील प्रेक्षकांना आपलासा वाटेल. रहस्य, विनोद आणि दमदार कथानकाची मेजवानी घेऊन येणारा 'तुंबाडची मंजुळा' हा चित्रपट आता ५ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. विविध कोरगांवकर दिग्दर्शित या चित्रपटाची कथा आणि लेखन ऋषिकेश तुरई यांनी केले असून झी स्टुडिओज प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती उमेश कुमार बन्सल आणि बवेश जानवलेकर यांनी केली आहे.

# ठाणे महापालिकेकडून सिंगल यूज प्लास्टिक विरोधात कारवाई

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सिंगल यूज प्लास्टिक (डणझ) बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण विभागाकडून विशेष मोहीम राबविण्यात आली. दिनांक ०१ एप्रिल २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत प्रभाग समिती निहाय घनकचरा व्यवस्थापन विभाग, अतिक्रमण विभाग व प्रदूषण नियंत्रण विभागामार्फत संयुक्तरित्या करण्यात आलेल्या कारवाईत एकूण १५७ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून सुमारे ७९ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर रु. ८०,५०० इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचे मुख्य पर्यावरण



अधिकारी मनिषा प्रधान यांनी नमूद केले. याशिवाय हवा प्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने स्वच्छ दक्षता समितीमार्फत २१ मे रोजी विविध बांधकाम स्थळांची पाहणी करण्यात आली. तसेच कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील हायवे लगत टाकण्यात आलेल्या राडारोड्याचीही तपासणी करण्यात आली असून संबंधित उपाययोजना सुचविण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.एकल वापर प्लास्टिक बंदी मोहिमेची प्रभावी अंमलबजवणीच्या अनुषंगाने केंद्रीय व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दर महिन्यालाअंमलबजावणी मोहिम राबविण्याचे निर्देश स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. तसेच तपासणीची संवेदनशीलता लक्षात घेवून, अनुचित घटना टाळण्यासाठी तपासणी पथकाला पोलीस संरक्षणासह सर्व प्रशासकीय मदतीचा समावेश करण्याची देखील सूचना केली आहे.

# कर्जतच्या आगरी समाज सभागृहाचे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते उदघाटन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या माध्यमातून बांधण्यात येत असलेल्या वातानुकूलित भव्य सभागृहाचे शनिवारी (ता. २३) सायंकाळी ५ वाजता आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते शानदार उदघाटन होणार आहे. या सभागृहाचे संपूर्ण अत्याधुनिक नूतनीकरण यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी सढळ हस्ते केलेल्या आर्थिक सहकार्याने होत आहे. या समारंभाला पनवेल



महापालिकेचे महापौर नितीन पाटील, बदलापूर नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, अंबरनाथ नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष सदानंद पाटील, प्रदीप पाटील, तसेच अन्य मान्यवर उपस्थित राहाणार आहेत. हा समारंभ हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील सामाजिक सभागृह नेरळ-बोपेले येथे होणार आहे.

# महिनाभरात वीज समस्या निकाली काढल्यास सत्कार अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

## MSEDCL व पोलीस प्रशासन बैठकीत नगरसेवक निशांत भगत यांची भूमिका

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

नवी मुंबईच्या वाशी-सानपाडा येथील प्रभाग क्र. १८ मधील वाशीगाव, सेक्टर ३१, ३१ (ए) गावठाण विस्तार योजना परिसर, सानपाडा – सोनखार (पामबीच) व वाशी सेक्टर १७ या विभागातील अनियमित वीजेची समस्या सोडविल्यास वीज वितरण अधिकारी, अभियंत्यांचा सत्कार करु अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नगरसेवक निशांत भगत यांनी MSEDCL व पोलीस प्रशासन बैठकीत दिला. गेल्या महिन्याभरापासून या परिसरातील नागरिक आणि व्यापाऱ्यांना विविध तांत्रिक कारणांमुळे १२ तासांपेक्षा अधिक तास वीजपुरवठा खंडित होणे, महानगरपालिकेच्या निष्काळजीपणामुळे आर्थिक नुकसान आणि खोदकाम व केबल दुरुस्तीच्या कामामुळे नागरिकांना वीजेच्या विविध तांत्रिक समस्यांना सामोरं जावं लागत



आहे. नवी मुंबई महापालिकेचे उपमहापौर दशरथ भगत यांच्यासोबत MSEDCL च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी २९ एप्रिल रोजी वाशीगाव येथे घेतलेल्या बैठकीनंतरही गेल्या महिन्याभरात परिस्थितीमध्ये कोणतीच सुधारणा झालेली नाही. उन्हाचा पारा वाढत असताना आणि वारंवार सूचना व हरकती दाखल करुनही वीज ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेतली जात नसल्यामुळे या विषयाचे गांभीर्य दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

प्रभाग क्र. १८ मधील वाशी – सानपाडा विभागातील वीज पुरवठ्यासंबंधित समस्यांबाबतीत वीज वितरणचे अधिकारी लोप्रतिनिधिंसह परिसर निहाय संयुक्त सर्वेक्षण करणार आहेत. वीज पुरवठ्या संबंधित कोणत्याही समस्येबाबत माहिती देणे व तक्रारीचे तात्काळ निवारण करण्यासाठी अधिकारी, अभियंते व नागरी प्रतिनिधींमचा व्हॉट्सअप ग्रुप तयार करणे, वाशीगाव परिसरातील एकूण सहा डिपींपैकी कोणत्याही एका डीपी मध्ये बिघाड झाल्यास पर्यायी मार्गाने वीज पुरवठा सुरु रहावा म्हणून या सहाही इंटरलिंकिंग करण्यात येईल, वीज पुरवठा स्थिर व अखंडित राहण्यासाठी आवश्यक आरएमयू (RMU) युनिट बसविण्यात येणार, विभागातील विद्युत पुरवठा करणा-या जुन्या, नादुरुस्त व जॉईंट्स मारलेल्या केबल वाहिन्या बदलणे, ही सर्व कामे महिन्याभराच्या आत पूर्ण करण्याचे ठोस आश्वास वीज वितरणचे वाशी विभागीय अधिक्षक अभियंता दिपक पाटील यांनी बैठकीत पोलिसांसमक्ष नगरसेवक व नागरिकांना दिले.नगरसेवक निशांत भगत यांनी बैठकीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांच्याकडे महिन्याभरात जर MSEDCL कडून वीज पुरवठा सेवेत सुधार न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यासाठी सहकार्य करण्याचे आणि वीज वितरण विभागाने आश्वासित मागळ्या वेळेत पूर्ण केल्यास अधिकारी व अभियंत्याचा सत्कार करू अशी भूमिका मांडली.आज झालेल्या या समन्वय बैठकीला नगरसेविका प्रिती संदीप भगत, वितरण मंडळाचे अधिकारी व अभियंते, समाजसेवक संदिप भगत आणि प्रभागातील नागरिक प्रतिनिधी उपस्थित होते

# गुंजेवाहीतील दुर्दैवी घटनेची आ.सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून गंभीर दखल
# मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजनांची मागणी

## वन विभागाचे सध्या चार्ज असलेले अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांच्यासोबत चर्चा
## नुकसानभरपाई वेळेत मिळण्यासाठी 'निगेटिव्ह ट्रेझरी सिस्टिम' लागू करण्याची मागणी

### मृतांच्या कुटुंबीयांना ३० दिवसांत आर्थिक मदत द्या; एआय आधारित पूर्वसूचना प्रणाली उभारण्याचे आ.सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन
### वनमंत्री असताना जनजागृती, वाघांचे स्थानांतरण आणि प्रतिबंधात्मक निर्णयांद्वारे मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याचा यशस्वी प्रयत्न

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर | प्रतिनिधी**

सिंदेवाही परिक्षेत्रातील गुंजेवाही येथील वनक्षेत्रात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या चार महिलांचा वाघाच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या हृदयद्रावक घटनेची राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी गंभीर दखल घेतली आहे. कावडबाई दादाजी मोहूर्ले (वय ४५), अनिताबाई दादाजी मोहूर्ले (वय ४०), सुनिता कौशिक मोहूर्ले (वय ३८) आणि संगीता संतोष चौधरी (वय ५०) या चारही महिलांच्या निधनाबद्दल त्यांनी तीव्र शोक व्यक्त करत, या दुःखद प्रसंगात मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी असल्याची भावना व्यक्त केली आहे. या घटनेत योगिता चंदपाल जेगटे (रा. वरवट वय ४५) ही महिला जखमी झाली. आ. मुनगंटीवार यांनी हे केवळ चार कुटुंबांवर आलेले संकट नसून वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाचे अत्यंत गंभीर आणि चिंताजनक स्वरूप असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.या घटनेच्या पार्श्वभूमीवर आ. सुधीर मुनगंटीवार यांनी वन विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने मदत मिळावी, यासाठी 'निगेटिव्ह ट्रेझरी सिस्टिम' लागू करण्याची मागणी केली. तसेच मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित पूर्वसूचना प्रणाली, स्मार्ट मॉनिटरिंग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आवश्यकता अधोरेखित केले. त्याचवेळी अशा घटनांकडे केवळ अपघात म्हणून न पाहता भविष्यातील गंभीर इशारा म्हणून पाहण्याची गरज असल्याचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.आजच्या बदलत्या परिस्थितीत पारंपरिक उपाययोजनांसोबत आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे ही काळाची अत्यावश्यक गरज बनली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ड्रोन सर्व्हेलन्स, सेन्सर आधारित अलर्ट सिस्टीम, रिअल-टाईम ट्रॅकिंग, जंगल परिसरातील स्मार्ट मॉनिटरिंग आणि नागरिकांना तात्काळ धोक्याची पूर्वसूचना देणारी यंत्रणा विकसित केल्यास अशा दुर्घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळवता



येऊ शकते. वन विभागाने या घटनेकडे केवळ एक दुर्घटना म्हणून न पाहता, भविष्यातील मोठा इशारा म्हणून गांभीर्याने पाहणे आवश्यक असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

राज्याचे वनमंत्री म्हणून कार्य करत असताना मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी आ. मुनगंटीवार यांनी अनेक दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतले होते. संवेदनशील क्षेत्रांमध्ये व्यापक जनजागृती मोहीम राबविणे, वनक्षेत्रालगतच्या गावांमध्ये सतर्कता वाढविणे, वाघांच्या स्थानांतरण संदर्भातील महत्त्वपूर्ण निर्णय, संघर्षग्रस्त भागात प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी, तसेच वन्यजीवांच्या हालचालींवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी यंत्रणा सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला होता. अशा उपायांमुळे अनेक भागांत संघर्षाच्या घटना कमी करण्यासाठी प्रभावी प्रयत्न करण्यात आले होते.

दरम्यान, वन्यप्राणी हल्ल्यात मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना शासन नियमानुसार तीस दिवसांच्या आत आर्थिक मोबदला देणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भात आ. सुधीर मुनगंटीवार यांनी वन विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांच्यासोबत चर्चा करून नुकसान भरपाईची प्रक्रिया अधिक गतीमान करण्यासाठी 'निगेटिव्ह ट्रेझरी सिस्टिम' लागू करण्याची मागणी केली.निधीअभावी किंवा प्रशासकीय विलंबामुळे मदत रखडू नये, तसेच पीडित कुटुंबीयांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळावे, यासाठी ही प्रणाली प्रभावी ठरू शकते, असे आ.मुनगंटीवार यांनी नमूद केले.या चारही मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी वन विभागाने युद्धपातळीवर कार्यवाही करावी, अशीही मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. मानव आणि वन्यजीव यांच्यातील समतोल राखत नागरिकांच्या जीवित सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे ही शासन आणि वन विभागाची सामूहिक जबाबदारी आहे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी तातडीने ठोस, आधुनिक आणि परिणामकारक उपाययोजना राबविणे आवश्यक असल्याचेही आ. श्री. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

# किडनी विक्री करणाऱ्या रोशन कुळे यांना मुख्यमंत्री सहायता निधीचा ५ लाखाचा धनादेश

## जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्या हस्ते मदतीचे वितरण; संकटातून उभारी देणारा शासनाचा आधार

दैनिक वादळ वार्ता
**ब्रम्हपुरी | प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील शेतकरी रोशन कुळे यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या ५ लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश मंगळवारी (दि.१९) चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सावकारीच्या विळख्यात अडकून किडनी विक्रीसारख्या अत्यंत वेदनादायी परिस्थितीला सामोरे जावे लागलेल्या रोशन कुळे आणि त्यांच्या कुटुंबासाठी हा क्षण दिलासादायक आणि नव्या आशेचा ठरला.माणुसकीचा आधार देणारी मदत राज्यभर गाजलेल्या या प्रकरणात रोशन कुळे यांनी सावकारी जाचामुळे किडनी विकावी लागल्याचा गंभीर आरोप केला होता. या घटनेनंतर शासनाने प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत मंजूर केली होती. आज त्या मदतीचा धनादेश अधिकृतरित्या वितरित करण्यात आला.ही मदत केवळ आर्थिक स्वरूपाची नसून, संकटाच्या अंधारात शासनाने दिलेला माणुसकीचा हात असल्याची भावना उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.संघर्षातून उभारीचा प्रयत्न रोशन कुळे यांच्यावर सावकारी कर्ज, मानसिक व आर्थिक छळ, मालमत्ता गमावण्याची वेळ आणि कथित किडनी विक्रीसारखे गंभीर संकट ओढवले होते. या सर्व पार्श्वभूमीवर शासनाने त्यांना न्याय देण्यासाठी विविध स्तरांवर हालचाली सुरू केल्या आहेत. शेती,



ट्रॅक्टर, गहाण ठेवलेले सोने आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू असतानाच मुख्यमंत्री सहायता निधीतील ही मदत त्यांच्या कुटुंबासाठी मोठा आधार मानली जात आहे.प्रशासनाचा संवेदनशील पुढाकार जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी रोशन कुळे यांच्याशी संवाद साधत त्यांच्या कुटुंबाची विचारपूस केली. शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया सुरू असल्याचा विश्वास प्रशासनाकडून यावेळी व्यक्त करण्यात आला. राज्यभर चर्चेत आलेले प्रकरण
रोशन कुळे प्रकरणामुळे सावकारी जाच, शेतकऱ्यांची बिकट आर्थिक अवस्था आणि कथित अवयव तस्करीच्या प्रश्नांवर राज्यभर चर्चा सुरू झाली होती. या प्रकरणात आधीच काही आरोपींना अटक करण्यात आली असून, तपास यंत्रणांकडून सखोल चौकशी सुरू आहे. दरम्यान, मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळालेली ही मदत रोशन कुळे यांच्या आयुष्यात नव्या उभारीची सुरुवात ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**शेतकऱ्याला किडनी विकण्याची वेळ येणे ही समाजासाठी धोक्याची घंटा**

नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील शेतकरी रोशन कुळे यांच्या प्रकरणाने संपूर्ण राज्याला अंतर्मुख केले आहे. सावकारीच्या विळख्यात अडकून एका शेतकऱ्यावर किडनी विक्रीसारखा टोकाचा निर्णय घेण्याची वेळ येणे, ही केवळ एका कुटुंबाची वेदना नसून समाजव्यवस्थेच्या अपयशाची गंभीर जाणीव करून देणारी घटना आहे.मुख्यमंत्री सहायता निधीतून देण्यात आलेली ५ लाख रुपयांची मदत ही निश्चितच दिलासादायक बाब असली, तरी अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी समाज, प्रशासन आणि शासनाने एकत्रितपणे जबाबदारी स्वीकारण्याची गरज निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात वाढता सावकारी जाच, शेतीतील तोटा, बेरोजगारी, मानसिक तणाव आणि आर्थिक असुरक्षितता यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. पैशासाठी माणसाला स्वतःचे अवयव विकण्याचा विचार करावा लागणे हे मानवतेला काळीमा फासणारे वास्तव असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# पालघर जिल्हा युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाची नवीन कार्यकारिणी जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**पालघर | प्रतिनिधी**

पालघर जिल्हा युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाची नवीन जिल्हा कार्यकारिणी नुकतीच एकमताने जाहीर करण्यात आली. जिल्ह्यातील शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या विविध समस्या सोडविणे, विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविणे तसेच क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणे हा महासंघाचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.महासंघाच्या अध्यक्षपदी संदिप रावते, कार्याध्यक्षपदी आलेश हाडळ यांची निवड झाली. उपाध्यक्ष म्हणून दिपक भुसारा आणि वर्षा धोडी, सचिवपदी सुभाष झिरवाळ तर सहसचिव म्हणून सुजित वाघात आणि सागर घायाळ यांची निवड करण्यात आली. खजिनदारपदी विनीत माहला यांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.मार्गदर्शकपदी जितेश भोये, निलेश गायकवाड, पांडुरंग भरसट आणि घनश्याम परिचारक यांची निवड करण्यात आली आहे.

संघटक म्हणून संदिप निखडे, मगन चौधरी,



प्रकाश रायात, रविंद्र गिंभल आणि निलेश कांटेला यांची निवड करण्यात आली. प्रसिद्धी प्रमुखपदी सुधाकर बेलकर तर सह प्रसिद्धी प्रमुख म्हणून विष्णू फडवले आणि सचिन गिंभल यांची निवड करण्यात आली आहे.तसेच सदस्य म्हणून सविता घाटाळ, संदिप पालवा, निलेश रावत्या, दिपक पवार, अजय डावरे, विजय डावरे, शंकर चौधरी, अविनाश भुसारा, योगेश धिंडे, महेश कामडी, ईश्वर हडबाल, सुरेश उंबरसाडा, नितीन टोकरे, अनिल बोलाडा, गणपत कोम आणि प्रमिला बोबा यांची निवड करण्यात आली.नवनिर्वाचित अध्यक्ष संदिप रावते यांनी सांगितले की, जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत शारीरिक शिक्षण आणि क्रीडा उपक्रमांचा दर्जा उंचावण्यासाठी महासंघ सातत्याने प्रयत्नशील राहील. शिक्षकांच्या समस्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने कार्य करत जिल्ह्यातील क्रीडा व शारीरिक शिक्षण क्षेत्र अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत २५ मे रोजीची यात्रा स्थगित

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राज्यातील सर्व धर्मियांमधील ६० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना, भारतातील तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांसाठी २५ मे ते ३० मे या कालावधीत महाबोधी मंदीर बुध्दगया (बिहार) येथे यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र काही कारणास्तव लाभार्थ्यांना घेऊन जाणारी २५ मे रोजीची यात्रा स्थगित करण्यात आली असून यात्रेची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त समाजकल्याण विनोद मोहतुरे यांनी केले आहे.

# युवक आणि शेतकरी हितासाठी विधान परिषदेत आवाज बुलंद करणार-आमदार विवेकभैय्या कोल्हे

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

शेतमालाला योग्य दर आणि बाजारभाव मिळाला पाहिजे, हीच आमची भूमिका आहे.वरिष्ठ सभागृहात शेतकरी हितासाठी सरकारकडे आग्रह धरणारा व युवकांचा हक्काचा प्रतिनिधी म्हणून काम करणार आहे.तुमच्या न्याय आणि हक्कासाठी आवाज उठवणारा घरातील व्यक्ती विधान परिषदेमध्ये गेलेला आहे, या माध्यमातून शेतकऱ्यांचे हिताचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी केले.नासिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील पाथरे येथे गुरुवार दिनांक २१ मे २०२६ रोजी विधान परिषदेचे आमदार विवेक कोल्हे यांच्या नागरी सत्काराचा भव्य सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिक जिल्ह्याचे खासदार राजाभाऊ वाजे उपस्थित होते. सत्कारमूर्ती म्हणून विधान परिषदेचे आमदार विवेकभैय्या कोल्हे यांचा ग्रामस्थांच्या वतीने मिरवणूक काढत सत्कार करण्यात आला.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे नेते भारतशेठ कोकाटे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र चव्हाणके, माजी पंचायत समिती सभापती बाळासाहेब वाघ, माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विठ्ठलराजे भोसले, शैक्षणिक क्षेत्रातील राजेश गडाख, प्रणवदादा पवार, कथले सर, अंबादास कदम आदीसह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार विवेकभैय्या कोल्हे पुढे म्हणाले की, या आमदारकीचा सातबारा जरी माझ्या नावावर असला, तरी या सातबाराच्या पोट हिस्सामध्ये सर्व कार्यकर्त्यांचा समान हिस्सा आहे. कोल्हे कुटुंबीय आणि पाथरे पंचक्रोशीचे एक अतूट व जिव्हाळ्याचे नाते आहे. संजीवनी सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीपासून या भागातील अनेक सभासद, कर्मचारी आणि शेतकरी 'तीन रुपये हजेरी' प्रमाणे कामासाठी येत असत. त्या काळापासून सुरू झालेला हा संबंध आज तिसऱ्या पिढीपर्यंत पोहोचला असून, अनेक ज्येष्ठ सहकाऱ्यांनी स्वर्गीय कोल्हे साहेबांसोबत कार्य केले आहे. त्यांच्या योगदानाचे



स्मरण करणे ही आजची गरज आहे.ते पुढे म्हणाले की, पाथरे, शहा, पंचाळे परिसर पूर्वी दुष्काळी भाग म्हणून ओळखला जात होता. स्वर्गीय कोल्हे साहेब १९६२ साली पंचायत समितीचे सभापती झाले, तर त्याआधीच १९५८ साली संजीवनी सहकारी साखर कारखान्याची पायाभरणी करण्यात आली होती. त्या काळापासून आजपर्यंत स्वर्गीय कोल्हे साहेबांचे या भागावर विशेष प्रेम आणि जिव्हाळा कायम राहिला आहे. तसेच मी तो जिव्हाळा यापुढेही असाच जपून ठेवणार आहे. असे सांगून पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांचे त्यांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रमास सिन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, पाथरे विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक, कोपरगाव येथील सहकार महर्षी शंकररावजी कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळ, कोपरगाव नगरपालिकेचे उपाध्यक्ष जितेंद्र रणशूर व सर्व नगरसेवक, कोपरगाव बाजार समितीचे सभापती व संचालक मंडळ, शिवसेना तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर गाडे तसेच कार्याध्यक्ष पिराजी पवार यांची उपस्थिती लाभली. विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

यावेळी सिन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, उपसभापती व संचालक मंडळ, खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष व संचालक मंडळ, सिन्नर नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक, तसेच पंचाळे, मिरगाव, सायाळे, कोळगाव, झापेवाडी, विधनवाडी, शहा व कारवाडी येथील ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच व सदस्य मंडळ यांची उपस्थिती होती.यावेळी आर. बी. चिने सर, शिवाजीकाका चिने, अशोकराव नरोडे, दौलत चिने, पाथरे खुर्द ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सदस्य मंडळ, तसेच पाथरे विकास सोसायटीचे अध्यक्ष व संचालक मंडळ उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन जालिंदर थोरात व समस्त ग्रामस्थ, पाथरे यांनी केले होते. कार्यक्रमाची प्रस्तावना जालिंदर थोरात यांनी केली. सूत्रसंचालन मनोज गवळी यांनी केले, तर आभार प्रदर्शन कृष्णा घुमरे यांनी केले.

# दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र,अंबाजोगाई तर्फे दुधाळ पशुधन व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र, अंबाजोगाई यांच्या वतीने दिनांक २३ मे २०२६ रोजी केज तालुक्यातील मौजे औरंगपूर येथे दुधाळ पशुधन व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेमध्ये शेतकऱ्यांना गोआधारित शेती,सेंद्रिय शेती तसेच शास्त्रीय पशुधन व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी गावचे सरपंच श्री. दिनकर जाधव हे होते. यावेळी उपसरपंच श्री. भीमराव धायगुडे,पोलीस पाटील श्री.सचिन फस्के, प्रगतशील शेतकरी श्री. सुरेश पारेकर,बचत गटाचे अध्यक्ष श्री.सुधीर रानमारे,सहाय्यक कृषी अधिकारी सौ.डाके तसेच कृषि विज्ञान केंद्राचे पशु तज्ञ डॉ.रवींद्र कोरके आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. रवींद्र कोरके यांनी सांगितले की,वाढत्या शेती उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी गोआधारित व नैसर्गिक शेतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी माती परीक्षण करून त्यानुसार संतुलित खत व्यवस्थापन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच रासायनिक खतांचा अतिरेकी वापर टाळून शेणखत,हिरवळीची खते,पिकांचे अवशेष, काडी-कचरा व इतर सेंद्रिय घटकांचा अधिक वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.तेपुढे म्हणाले की,जमिनींमधील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असून ते वाढविण्यासाठी सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. पशुधनाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने खाद्य व्यवस्थापन करणे, नियमित तीन महिन्यांनी जंतनिर्मूलन करणे तसेच वेळापत्रकानुसार लसीकरण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यामुळे पशुधनाचे विविध संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण होऊन दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होते,असेही त्यांनी सांगितले.या कार्यशाळे दरम्यान



निकृष्ट प्रतीच्या कोरड्या चाऱ्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी व्ही एन आय टी नागपूर यांनी संशोधित केलेल्या सुरभी पाचकसत्त्व प्रक्रियेचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. सुरभी पाचकसत्त्वाच्या वापरामुळे सोयाबीन भुसा,हरभरा भुसा,ज्वारी कडबा यांसारख्या निकृष्ट प्रतीच्या चाऱ्याची पचनीयता सुधारते. त्यामुळे पशुधनाची पचनक्रिया सुधारून दूध उत्पादनात वाढ होते.

पाच किलो कोरड्या चाऱ्यावर अडीच ग्रॅम सुरभी पाचकसत्त्वाची प्रक्रिया करून ते एका पशुधनास खाऊ घालावे लागते.यासाठी प्रतिदिन प्रति पशुधन सुमारे एक रुपया इतकाच खर्च येतो. सुरभी पाचकसत्त्वाच्या वापरामुळे म्हैसपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना महिन्याकाठी सुमारे दीड हजार रुपये अतिरिक्त उत्पन्न मिळत असल्याचे तसेच संकरित गाईंचे संगोपन करणाऱ्या शेतकऱ्यांना सुमारे एक हजार रुपयांपर्यंत अतिरिक्त फायदा झाल्याचे निष्कर्ष प्राप्त झाले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. याचबरोबर सहाय्यक कृषी अधिकारी सौ.डाके यांनी शेतकऱ्यांना नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना योजनेची माहिती देऊन शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.या कार्यशाळेत औरंगपूर येथील एकूण ४१ शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. सुधीर रानमारे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# नैसर्गिक वर्ग वाढ तुकडींना तात्काळ अनुदान देण्यात यावे-शेषराव चव्हाण

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**




वित्त विभागाच्या अधीन राहून नैसर्गिक वर्गवाढीने मान्यता प्राप्त संस्था चालकांची महत्त्वपूर्ण बैठक आज साने गुरुजी निवासी विद्यालय,केज, जि.बीड येथे संघटनेचे अध्यक्ष श्री.शेषेराव चव्हाण यांच्या अध्यक्षते खाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.कार्यक्रमाची प्रस्तावना संघटनेचे सचिव अड.श्री.उद्धव कराड सर यांनी केली. सूत्रसंचालन डॉ.कविता कराड मॅडम यांनी केले तर स्वागतगीत साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या शिक्षिका शेख मॅडम यांनी सादर केले.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली.या बैठकीस ज्येष्ठ संस्थाचालिका सौ. पुष्पाताई संभाजीराव पगारे मॅडम,ज्येष्ठ संस्था चालक श्री.मानवेंद्र केंद्रे, संघटनेचे उपाध्यक्ष श्री.राजेंद्र चव्हाण, श्री.शंकर राठोड, श्री.अनुरथ सानप, श्री.अनिल महाराज यांच्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून जवळपास १५० संस्था चालक उपस्थित होते. अनेक संस्थाचालकांनी काही कामानिमित्त येता आले नाही त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून संघटना जो निर्णय घेईल तो आम्हाला मान्य आहे असे सांगितले.बैठकी मध्ये नैसर्गिक वर्गवाढीने मान्यता प्राप्त वर्गांना अनुदान मिळवून घेण्यासाठी पुढील रणनीती,शासनस्तरा वरील पाठपुरावा व संघटनात्मक बळकटीकरण याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.उपस्थित सर्व संस्थाचालकांनी एकमुखाने संघटनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला तसेच नैसर्गिक वर्गवाढीने मान्यता प्राप्त वर्गांना लवकरात लवकर अनुदान मिळवून घेण्यासाठी एकजुटीने राहण्याचा संकल्प केला.बैठकीत आश्रम शाळांच्या विविधसमस्या, शाळांच्या आर्थिक अडचणी तसेच शासनाकडे प्रलंबित असलेल्या मागण्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.राज्यातील सर्व संस्थांनी संघटनेच्या नेतृत्वाखाली प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.बैठकीचा समारोप सकारात्मक,उत्साह वर्धक व संघटनात्मक एकतेचा संदेश देणाऱ्या वातावरणात झाला.

# मोजणीविना डी.पी.रोडचे काम सुरु? कोनाच्या फायद्या साठी; लोहा शहरात चर्चेला उधाण

## लोहा नगरपरिषदेच्या कामावर भाजपा नेते गजानन सूर्यवंशी यांचा गंभीर आरोप; जिल्हाधिकाऱ्यांकडे चौकशी व काम स्थगितीची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । प्रतिनिधी**

लोहा नगरपरिषदेमार्फत सुरू असलेल्या डी.पी. रोडच्या कामावरून मोठा वाद निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेत कोणतीही अधिकृत मोजणी, सीमांकन अथवा डिमार्केशन न करता आरसीसी रस्त्याचे काम सुरू करण्यात आल्याचा गंभीर आरोप भाजपा लोहा शहर मंडळ अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष गजानन सुभाषराव सूर्यवंशी यांनी केला आहे. या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून तात्पुरत्या स्वरूपात काम त्वरित बंद करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



दि. १९ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे सादर करण्यात आलेल्या निवेदनात सूर्यवंशी यांनी नमूद केले आहे की, लोहा नगरपरिषद क्षेत्रात सुरू असलेले डी.पी. रोडचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील जागेत होत आहे. मात्र संबंधित जागेची कायदेशीर हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली नसताना थेट आरसीसी रस्त्याचे काम सुरू करण्यात आले असल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.सदर डी.पी. रोडची रुंदी १२ मीटर असल्याचे नमूद करण्यात आले असले तरी नगररचना विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून अथवा भूमी अभिलेख विभागाकडून अधिकृत सीमांकन मोजणी झालेली नसल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. कोणतीही तांत्रिक पडताळणी न करता सुरू असलेले काम भविष्यात मोठ्या प्रशासकीय व कायदेशीर वादाला कारणीभूत ठरू शकते, असा इशाराही सूर्यवंशी यांनी दिला आहे.नियमबाह्य पद्धतीने विकासकामे राबविणे हे शहराच्या भविष्यासाठी धोकादायक आहे. संबंधित जागेचे अधिकृत हस्तांतरण, मोजणी आणि आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच काम पुढे सुरू करावे, अशी मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे.दरम्यान, या प्रकरणामुळे शहरातील नागरिकांमध्येही चर्चा रंगली असून, प्रशासन या तक्रारीची दखल घेऊन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. डी.पी. रोडच्या कामावरून निर्माण झालेला हा वाद आगामी काळात आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# कोळगाव येथे जगताप मळा साठवण बंधारा फोडला
## संतप्त शेतकऱ्यांची दोषींवर कडक कारवाईची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**

पावसाळा तोंडावर आलेला असतानाच, कोळगाव येथील जगताप मळा भागातील पाणी साठवण बंधारा काही इसमांनी बेकायदेशीरपणे फोडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या स्थानिक शेतकऱ्यांनी दोषींवर तात्काळ कडक कारवाई करण्याची आणि बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. याप्रकरणी कारवाई न झाल्यास तीव्र उपोषणाचा इशाराही शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला आहे.

**प्रशासनाला खुले आव्हान; पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर**

मिळालेल्या माहितीनुसार, कोळगाव येथील 'जगताप मळा' नावाचा महत्त्वाचा साठवण बंधारा काही दिवसांपूर्वी सुनील जगताप व मधुकर जगताप या इसमांनी संगनमत करून फोडल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. आगामी



पावसाळ्यात पाणी साठवणूक करून पुढील वर्षभराच्या पाण्याचे नियोजन करणे गरजेचे असताना, अशा पद्धतीने सरकारी किंवा सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे म्हणजे प्रशासनाला खुले आव्हान असल्याच्या भावना नागरिक व्यक्त करत आहेत.या बंधाऱ्यातील पाण्यावर परिसरातील अनेक शेतकऱ्यांची पिके अवलंबून आहेत, तसेच स्थानिक नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही या बंधाऱ्याशी निगडित आहे. बंधारा फोडल्यामुळे भविष्यात येथे पाण्याचे भीषण संकट उभे राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

**शेतकऱ्यांची तहसीलदारांकडे लेखी तक्रार; उपोषणाचा इशारा**

या गंभीर प्रकारानंतर स्थानिक शेतकऱ्यांनी एकत्र येत माननीय तहसीलदार आणि संबंधित इतर विभागांकडे लेखी स्वरूपात तक्रार दाखल केली आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे प्रामुख्याने खालील मागण्या केल्या आहेत:

दोषींवर कठोर कारवाई: बंधारा फोडणाऱ्या संबंधित व्यक्तींची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

पावसापूर्वी दुरुस्ती: पावसाळा सुरू होण्यापूर्वी या साठवण बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करून तो पूर्ववत करण्यात यावा, जेणेकरून पावसाचे पाणी वाहून जाणार नाही.

**शेतकऱ्यांचा इशारा**

हा आमच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. जर प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेतली नाही आणि दोषींवर तातडीने कारवाई करून बंधारा दुरुस्त केला नाही, तर सर्व शेतकरी प्रशासनाविरोधात तीव्र उपोषणाला बसतील.आता या संपूर्ण प्रकरणावर तहसीलदार आणि संबंधित जलसंधारण विभाग काय पावले उचलणार, याकडे संपूर्ण कोळगाव परिसराचे लक्ष लागले आहे.

# मदनूर रस्त्यावर भीषण अपघात शहापूर येथील आई-मुलगा जागीच ठार

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील शहापूर येथील रहिवासी असलेल्या यंजपवार कुटुंबावर काळाने अत्यंत क्रूर घाला घातला आहे. शुक्रवार, २२ मे रोजी दुपारच्या सत्रात मदनूर रस्त्यावर झालेल्या एका भीषण रस्ते अपघातात शेषाबाई गौराजी यंजपवार (वय ६८) आणि त्यांचा मुलगा पंढरी गौराजी यंजपवार (वय ५५) या माय-लेकाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण शहापूर गावासह देगलूर परिसरावर शोककळा पसरली असून सर्वत्र तीव्र दुःख व्यक्त होत आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शेषाबाई आणि पंढरी हे दोघे माय-लेक मेनूर येथे आपल्या एका नातेवाईकाच्या तेरवीच्या जेवणाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. दुपारच्या सत्रात कार्यक्रम आटोपून ते आपल्या वाहनाने शहापूरकडे परतत असताना मदनूर रस्त्यावर त्यांच्या वाहनाला भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भयानक होता की, यात माय-लेकाचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

यंजपवार कुटुंबावर गेल्या काही दिवसांतील हे सलग दुसरे मोठे संकट आहे. काही दिवसांपूर्वीच पंढरी यंजपवार यांच्या पत्नीचे आकस्मिक निधन झाले होते. पत्नीच्या निधनाच्या धक्क्यातून हे कुटुंब



अजून सावरलेही नव्हते, तोच हा दुसरा भीषण अपघात घडला. या अपघातामुळे मयत पंढरी यांच्या पश्चात आता घरात केवळ त्यांचे वृद्ध वडील आणि तीन मुली असा परिवार उरला आहे.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच पंढरी यांच्या एका मुलीचा साखरपुडा संपन्न झाला होता. अधिक महिना संपल्यानंतर घरात लग्नाची सनई वाजणार होती आणि मुलीच्या लग्नाची तयारी सुरू होती. घरात आनंदाचे कारज ठरत असतानाच नियतीने घात केला. ज्या घरात मंगल कार्य होऊन अक्षता पडणार होत्या, त्याच घरातून एकाच वेळी माय-लेकाची अंत्ययात्रा काढण्याची दुर्दैवी वेळ आल्याने उपस्थित प्रत्येकाचे डोळे पाणावले होते. या अमंगल घटनेमुळे संपूर्ण परिसरातून तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# कल्याण पोलिसांची धडाकेबाज कारवाई; ३४ कोटींची ब्राऊन शुगर जप्त, पठाण गँगच्या म्होरक्याला अटक

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

कल्याण पोलिसांनी अंमली पदार्थ तस्करी विरोधात मोठी कारवाई करत तब्बल ३४ कोटी रुपये किमतीचा ब्राऊन शुगर साठा जप्त केला आहे.या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि कुख्यात तस्कर अमजद पठाण याला अटक करण्यात आली आहे.अमजद पठाण याच्यावर चार खुनांसह एकूण २० गंभीर गुन्हे दाखल आहेत.त्याच्या अटकेमुळे परिसरातील संघटित गुन्हेगारी आणि अंमली पदार्थांच्या रॅकेटवर मोठा आघात झाल्याचे मानले जात आहे. काही दिवसांपूर्वी कल्याण परिमंडळाचे पोलीस उपायुक्त पथक आणि महात्मा फुले पोलीस ठाण्याच्या पोलिसांकडून संयुक्त कारवाई करत ३२ कोटी रुपयांचा ब्राऊन शुगर साठा जप्त केला होता.तपासादरम्यान हा अंमली पदार्थ कुख्यात पठाण गँगचा असल्याचे निष्पन्न झाले.हा ब्राऊन शुगर नाशिकहून कल्याणमध्ये आणण्यात आला होता. कल्याण तसेच आसपासच्या भागात त्याचे वितरण होणार असल्याची माहिती समोर आली.या प्रकरणात पोलिसांनी कासिम वसेकर,कृष्णा हळेमणी,गणेशन जंगमार आणि सद्दाम शेख यांना अटक केली होती. कल्याणचे डीसीपी अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण मध्ये ही आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई मानली जात आहे.त्यानंतर मुख्य आरोपी अमजद पठाण याचा शोध सुरू करण्यात आला होता.अखेर पोलिसांनी त्याला अटक करण्यात यश मिळवले.अमजद पठाण १९९५ पासून अंमली पदार्थांच्या तस्करीत सक्रिय होता. त्याच्यावर एकूण २० गुन्हे दाखल असून त्यात चार खुनांच्या गुन्ह्यांचाही समावेश आहे. अमजदविषयी किंवा त्याच्या अवैध धंद्यांबाबत पोलिसांना माहिती पुरवणाऱ्यांना लक्ष्य करून त्यांची हत्या केल्याचेही आरोप त्याच्यावर करण्यात आले होते. यामुळे या गँगची परिसरात मोठी दहशत निर्माण झाली होती.कल्याण पश्चिमेतील बैल बाजार परिसरातील जेठा कंपाऊंड याकूब मंजिल इमारतीत राहणाऱ्या अमजद पठाणचा भाऊ देखील गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याची नोंद असून,त्याचा दिल्लीत अपघातात मृत्यू झाला होता. पठाण कुटुंबाचा गुन्हेगारी इतिहास आणि संघटित नेटवर्क यामुळे या गँगचा प्रभाव अनेक वर्षे कायम होता.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077